RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक ४९] मंगळवार, जुलै २६, २०२२/श्रावण ४, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

१ ला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ जुलै २०२२.

**अधिसूचना**

**शुद्धिपत्रक**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.३५/का-५.— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन१९४९ चा मुंबई ५९) (यापुढे सदर अधिनियम म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ५(३) व कलम १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मा. राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक **रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.३५/का-५,** दिनांक १८ जुलै २०२२ अन्वये अधिसूचना अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करून सदर अधिसूचना असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, असाधारण क्रमांक ७९ वर दिनांक १९ जुलै २०२२ रोजी छापण्यात आली होती, आणि ज्याअर्थी, सदर **राजपत्रात** टंकलेखन दुरुस्ती करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, मी, श्री. यु.पी.एस.मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र सदर **राजपत्रातील** मराठी अनुसूचीतील प्रभाग क्र. ३४ समोरील नोंद दुरुस्त करण्याकरिता पुढीलप्रमाणे शुद्धिपत्रक प्रसिद्ध करीत आहे :—

प्रभाग क्र. ३४ समोरील मूळ नोंदी ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित **दुरुस्त मजकूर** वाचण्यात यावा :—

**अनुसूची**

| प्रभाग क्रमांक व लोकसंख्या (१) | प्रभागाचे नाव, असल्यास (२) | प्रभागाची व्याप्ती (३) |
|---|---|---|
| **प्रभाग क्रमांक — ३४**<br>लोकसंख्या<br>एकूण - १४,१९१<br>अ. जा. - ३६७<br>अ. ज. - २२९ | | **व्याप्ती**<br>**उत्तर.—** जुना मुंबई आग्रा रस्त्यावरील गायत्रीधाम सोसायटीपासून ओसवालवाडी रस्त्याने मनपा शाळा क्र. ४२ कूंपण भिंतीने उजवीकडे वळून खुल्या जागेतून आकाश कांबळे यांचे घरापर्यंत तेथून उजवीकडे वळून पप्पू हॉटेल रेल्वे स्टेशन रोडने धनश्री मेडिकलवरून ओमकार मेडिकलपर्यंत तेथून उजवीकडे वळून कामतघर ताडाळी रोडने टिचर्स कॉलनीपर्यंत तेथून रस्ता ओलांडून समीर अपार्टमेंटच्या कूंपण भिंतीने तानसा पाईपलाईनपर्यंत तेथून डावीकडे वळून तानसा पाईप लाईनच्या हद्दीने मनपा हद्दीपर्यंत.<br>**पूर्व.—** मनपा हद्दीने तानसा पाईपलाईनपासून राजेंद्र ठाकूर गार्डनवरून मनपा हद्द स.नं.**१९१** पर्यंत.<br>**दक्षिण.—** मनपा हद्द स.नं. **१९१** पासून मनपा हद्दीने तानसा पाईपलाईनपर्यंत व पुढे मनपा हद्दीने सर्व परिसहारा संकुल जाणाऱ्या रस्त्यापर्यंत.<br>**पश्चिम.—** सर्व परिसहारा संकुलाकडे जाणाऱ्या रस्त्यापासून मनपा हद्दीने स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याने जुना मुंबई-आग्रा रस्त्यापर्यंत व पुढे मुख्य रस्त्याने नवकार हाईट इमारती वरून रस्त्याने ओसवाल वाडी हॉलवरून ओसवाल वाडी गायत्रीधाम सोसायटीपर्यंत. |

**टीप.—**

१. दिनांक १९ जुलै २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेतील उर्वरित मजकुरात कुठलाही बदल नाही.

**यु. पी. एस. मदान,**
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.